जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक

बीड

# लोकनेता


Lokneta News - लोकनेता न्युज

dainiklokneta.in

मुख्य संपादक : ज्ञानेश्वर मुंडे




शनिवार दि.१८ ऑक्टोबर २०२५ RNI-MAHMAR/2023/89402 Email : dnyaneshmofficial@gmail.com वर्ष : ०३ अंक : ७२ किंमत २ रुपये 7499615933




# बीडमध्ये ओबीसींचा ऐतिहासिक महाएल्गार मेळावा भुजबळ व मुंडेंच्या उपस्थितीत संपन्न

## धनंजय मुंडे बऱ्याच दिवसांनी कडाडले; जरांगेंवर प्रचंड हल्लाबोल

## मराठा समाज बांधवांनी मराठा समाजाला फसवणाऱ्याच्या नादी लागू नये; मराठ्यांचा फायदा ईडब्लूएस मध्ये आहे–धनंजय मुंडे

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड | प्रतिनिधी**

बीड शहरात आज ओबीसी समाजाचा एल्गार मेळावा प्रचंड उत्साहात आणि तुफान गर्दीत पार पडला. मैदानावर पहाटेपासूनच जनतेचा ओघ सुरू होता. हातात झेंडे, घोषणांनी गाजलेली मिरवणूक आणि जय ओबीसी, आरक्षण वाचवाच्या जयघोषांनी संपूर्ण शहर दणाणून गेलं. या मेळाव्याचा केंद्रबिंदू ठरले माजी मंत्री धनंजय मुंडे, ज्यांनी आपल्या आक्रमक भाषणाने वातावरण भारावून टाकलं.मुंडेंनी मंचावरून आपल्या ठाम भूमिकेतून मनोज जरांगे यांच्या आंदोलनावर थेट टीका केली. एका व्यक्तीने जाती–जातीत एवढं विष पेरलं की भाऊभाऊ एकमेकांविरोधात उभे राहिले, असं म्हणत त्यांनी जरांगे यांचा नाव न घेता जोरदार समाचार घेतला. त्यांनी सांगितलं की, ओबीसी समाजाने शांत बसायचं नाही. मराठा समाजाला आरक्षण द्यायचं आम्हाला काही आक्षेप नाही, पण आमच्या ताटातलं कोण घेणार असेल, तर आम्ही ते सहन करणार नाही, असं ते ठामपणे म्हणाले.मुंडेंनी पुढे स्पष्ट केलं की, मराठ्यांनी आपलं वेगळं आरक्षण घ्यावं, त्यासाठी आम्हीही पाठिंबा देऊ, पण ओबीसींच्या हक्काचं आरक्षण कुणी घेत असेल तर आम्ही मैदानात उतरू. त्यांनी जरांगे यांच्या भूमिकेवर निशाणा साधत सांगितलं, त्या बिनडोक माणसाच्या नादाला लागू नका. समाज तोडणं सोपं असतं, पण बांधणं अवघड असतं. आम्ही आमच्या हक्कासाठी शांततेने पण ठामपणे उभे राहणार आहोत.मेळाव्यात छगन भुजबळ यांच्या नेतृत्वावरही त्यांनी शिक्कामोर्तब करत म्हटलं, ओबीसींचा नेता एकच – छगन भुजबळ! त्यांच्या नेतृत्वाखाली आपलं आरक्षण वाचवू आणि आपल्या समाजाला न्याय मिळवू. कुणालाही घाबरायचं नाही, जो अंगावर येईल त्याला उत्तर देऊ.बीडमधील या मेळाव्याने राज्यातील राजकीय वातावरणात चांगलाच खळबळ माजवली आहे. ओबीसी समाजाने दाखवलेली एकजूट, लोकांची उत्स्फूर्त गर्दी आणि मुंडेंच्या शब्दांचा ठसा बीडच्या राजकारणावर कायमचा उमटला आहे.आपसातील मतभेद विसरून एकत्र या, असं आवाहन करत मुंडेंनी भाषणाचा शेवट केला आणि म्हणाले, आता वेळ आली आहे, आपल्या हक्कासाठी आवाज बुलंद करण्याची.मैदानातून बाहेर पडताना लोकांच्या चेहऱ्यावर आत्मविश्वास आणि निर्धार स्पष्ट दिसत होता. बीडमध्ये आज ओबीसींचा एल्गार केवळ एक मेळावा नव्हता – तो समाजाच्या आत्मसन्मानाचा, एकतेचा आणि जागृतीचा नवा संदेश ठरला.




# बिबट्याच्या धास्तीत असतानाच आष्टी तालुक्यात चोरट्यांची दहशत

## फिंगर प्रिंट स्कॉड, डॉग स्कॉड, फॉरेन्सिक सायन्स लॅबोरेटरी' स्कॉडला पाचारण

### अंभोरा पोलिस ठाणे हद्दीत चोरट्यांची शेतकऱ्यांना मध्यरात्री केली मारहाण महिलेचा कान तुटला,वृद्धाच्या डोक्यात दगड मारला

लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी | प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यात बिबट्याच्या दहशतीने शेतकरी आधीच भयभीत आहेत.अशातच अंभोरा पोलिस ठाणे हद्दीतील अरणविहरा येथील वयोवृद्ध शेतकरी दांम्पत्यांना मध्यरात्री चोरांनी मारहाण करत ३ तोळे सोने व १३ हजार रुपये रोख रक्कम घेऊन पोबारा केला या मारहाणीमध्ये महिलेचा कान तुटला असून वृद्धाच्या डोक्यामध्ये दगड मारल्याने मोठी जखम झाली आहे. घटनास्थळी कर्तव्यदक्ष सपोनि मंगेश साळवे यांनी माहिती कळताच भेट देऊन फिंगर प्रिंट स्कॉड,डॉग स्कॉड,फॉरेन्सिक सायन्स लॅबोरेटरी' स्कॉडला पाचारण केले आहे.

तालुक्यातील अंभोरा पोलीस ठाणे हद्दीतील अरणविहरा येथील नवनाथ जाधव आणि रावसाहेब जाधव या दोन शेतकऱ्यांची घरे अर्धा किलोमीटर अंतरावर आहेत. नेहमीप्रमाणे जेवण करून गाढ झोपलेल्या या कुटुंबांना लक्ष्य करत चोरट्यांनी मध्यरात्री २ वाजण्याच्या सुमारास बंद घराचे दार तोडून आत प्रवेश केला. घरात ठेवलेले सोने द्या म्हणत कुटुंबातील वृद्धांना धमकावले. वृद्ध दाम्पत्याने विरोध करताच, चोरट्यांनी अमानुषपणे त्यांना मारहाण केली. दागिने ओरबाडून घेत असताना महिलेच्या कानातील दागिने काढताना तिचा कान तुटला आणि नाकालाही गंभीर दुखापत झाली. पुरुषांनाही बेदम मारहाण करण्यात आली. यामध्ये डोक्यात दगड फिरकावल्याने जखम झाली आहे.यामध्ये ३ तोळे दागिने व रोख रक्कम १३ हजार रुपये ऐवज लांबवला आहे.या घटनेने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून बिबट्याच्या दहशतीच्या घटना ताज्या असतानाच चोर दहशत माजवल्याने पोलिसांनी गस्त वाढवण्याची मागणी नागरिकांनी केली आहे. या घटनेची माहिती कळताच सपोनी मंगेश साळवे यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देत वरिष्ठांना व विविध स्कॉडला पाचारण केले आहे. यावेळी पोलीस शिवदास केदार,अमोल शिरसाट,मनोज कुमार खंडागळे आदींनी भेट देऊन घटनास्थळाची पाहणी केली व स्कॉडला पाचरण करण्यात आले आहे.



### बिबट्या नंतर चोरट्यांची दहशत तात्काळ पोलिसांनी गस्त वाढवावेत

**बिबट्याच्या दहशतीने अगोदरच नागरिक भयभीत झाले असून घराबाहेर पडत नाहीत अशातच चोरट्यांनी मध्यरात्री आमच्या गावातील दोन वृद्धांना अमानुषपणे मारहाण केल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून चोरट्यांचा बंदोबस्त करून परिसरात पोलिसांचे गस्त वाढवावेत घटनेची माहिती मिळताच अंभोरा ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक मंगेश साळवे यांच्यासह पथकाने तातडीने घटनास्थळी भेट देऊन तपासाला सुरुवात केली आहे.– सरपंच अण्णासाहेब शिरसाट**






# जनतेच्या मनात परिवर्तनाची भावना, भालगाव गटात ठरणार भविष्याचे वारे

## दिलीप खेडकर मैदानात असल्याची जोरदार चर्चा

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बाळासाहेब खेडकर | प्रतिनिधी**

राज्यात नुकत्याच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीचे वारे वाहू लागले आहेत निवडणुकीच्या तोंडावर जातीय समीकरणाला मोठा वेग आला आहे नुकतेच स्थानिक स्वराज्य संस्थेचे आरक्षण जाहीर झाल्यापासून इच्छुकांची गर्दी वाढताना दिसत आहे, जातीय समीकर बघता भालगाव गटामध्ये वंजारी समाजाची मोठी संख्या असल्याचे दिसून येते याचबरोबर पक्षाची भूमिका खूप महत्वाची मानली जाते. माजी आयुक्त दिलीप खेडकर हे स्वतः मैदानात असल्याची चर्चा सध्या सुरू आहे त्यांच्या विरोधातील उमेदवार कोण असेल यावरती विविध तर्क लावले जात आहेत, माजी जिल्हा परिषद सदस्या प्रभावती ढाकणे या मैदानात उतरणार की त्यांचे चिरंजीव या निवडणुकीच्या निमित्ताने राजकारणात येणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.गटातील सर्वसामान्याची भावना बघता दिलीप खेडकर हे प्रबळ उमेदवार म्हणून रिंगणात आहेत व राजकीय पाठबळ किवा वारसा नसताना देखील त्यांनी आपल्या परिवर्तन प्रतिष्ठानच्या माध्यमातून गावोगावी विकासकामे केलेली आहेत त्याचा या निवडणुकीवर मोठा परिणाम दिसून येणार आहे महिलावर्ग व तरुण त्यांचे मोठे चाहते असल्याचे दिसून येते माजी सदस्याच्या तुलनेत खेडकर हे उच्चशिक्षित, प्रशासकीय अनुभव व दूरदृष्टी असलेले नेते म्हणून त्यांची ओळख आहेमागील २० वर्ष भाजपच्या प्रती असलेली खेडकर परिवाराची निष्ठा मध्यंतरी लोकसभा निवडणुक उमेदवारीमुळे दरी पडलेली दिसून आली परंतु आता भाजप आपल्या निष्ठेचे फळ देणार का हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे, तालुक्यातील राजकीय समीकरणे दिवसेंदिवस बदलत चाललेले असताना जनतेच्या मनातील उमेदवारास कोणता पक्ष आपल्या बाजूने ओढतो यावरती समीकरणे अवलंबून आहेत.



# मनसे शेवगाव तालुका अध्यक्ष गणेश रांधवणे यांचा भाजपात प्रवेश

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बाळासाहेब खेडकर | पाथर्डी**

अहिल्यानगर जिल्ह्यातील शेवगाव येथील गणेश रांधवणे या राज ठाकरे यांच्या शिलेदाराने राज ठाकरे यांची साथ सोडत भाजपात प्रवेश केला असून मुंबई येथील भाजप पक्ष कार्यालयात प्रदेशाध्यक्ष श्री.रविंद्र चव्हाण यांच्या हस्ते व आमदार मोनिका राजळे यांच्या उपस्थितीत भारतीय जनता पक्षात प्रवेश केला असून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेसाठी हा मोठ्ठा धक्का मानला जात आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील राज ठाकरे यांचे निकटवर्तीय व आक्रमक महाराष्ट्र सैनिक म्हणून गणेश रांधवणे यांची मनसेत महाराष्ट्रभर ओळख होती. गेल्या २० वर्षांपासून ते राज ठाकरे यांचे खंदे समर्थक म्हणून ओळखले जात होते. २००६ साली राजकारणात सक्रिय होत त्यांनी मुंबईतुनच राज ठाकरे यांची साथ धरत मनसेचा झेंडा हाती घेत आजतागायत महाराष्ट्र



नवनिर्माण महाराष्ट्र नवनिर्माण सेनेत असताना २०१४ साली गारपीटीची पहाणी करण्यासाठी आलेल्या तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या ताफ्यावर दगडफेक करून निषेध नोंदवल्याने महाराष्ट्र भर राज ठाकरेचे आक्रमक निकटवर्तीय म्हणून परिचित झाले. मुंबई येथील कळंबोली येथील २००६ साली राज यांच्या सभेसाठी जात असतानाच महाराष्ट्रात पहिल्या टोल नाक्यावर तसेच नेवासा फाटा येथील टोल नाक्यावर दगडफेक करून नासधूस करत ते कायम राज यांच्या नजरेत राहीले. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेत विविध आंदोलनात आक्रमक असल्याने त्यांच्यावर १२ ते १५ राजकीय गुन्हे दाखल होते. गणेश रांधवणे यांच्या रुपात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने जिल्ह्यातील एक आक्रमक चेहरा गमावला असल्याची भावना महाराष्ट्र सैनिकांत निर्माण झाली. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे तालुकाध्यक्ष गणेश रांधवणे यांच्यासह शेवगावचे माजी सरपंच सतीश लांडे,बालमटाकळी येथीलविविध कार्यकारी सेवा सोसायटीचे चेअरमन प्रसाद पवार, उद्योजक पांडुरंग नवले आदींनी भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत भाजपात प्रवेश केला. मुंबईत भारतीय जनता पक्षाच्या कार्यालयात प्रदेशाध्यक्ष श्री.रविंद्र चव्हाण यांच्या हस्ते व आमदार मोनिका राजळे ,जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग यांच्या प्रमुख उपस्थितीत हा प्रवेशाचा कार्यक्रम संपन्न झाला.या राजकीय घडामोडीचे भविष्यात पडसाद तालुक्यातील राजकारणात उमटण्याची शक्यता निर्माण झाली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपमध्ये झालेली ही तरुणांची मोठी 'इनकमिंग पक्षासाठी महत्त्वाची मानली जात आहे. या घडामोडीमुळे मनसेला ऐन निवडणुकीच्या 'तोंडावर खिंडार पडले आहे. तालुक्यात मनसेची स्थापना करत गेली १९ वर्ष रांधवणे यांनी मनसेचे काम केले. लवकरच आणखी काही पदाधिकारी, कार्यकर्त्यांचा पक्ष प्रवेश आगामी काळात होणार असल्याचीही माहिती आहे. यावेळी भाजपचे तालुकाध्यक्ष महेश फलके,संजय टाकळकर, भूषण देशमुख, गणेश कोरडे,सागर फडके,बापुराव धनवडे, दत्तात्रय आरे,राजेंद्र कुसळकर,संदिप देशमुख, अशोकर खिळे, मयूर हुंडेकरी,बाळासाहेब डोंगरे यांच्यासह पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते

## किनवट नगराध्यक्ष पदासाठी बाबाभाईंची तयारी जोरात!

# आरक्षण जाहीर होताच राजकीय वर्तुळात चैतन्य तरुण उद्योजकाची निवडणुकीत उतरायची तयारी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**किनवट | शेख शौकत**

नगरपालिकेच्या थेट नगराध्यक्ष पदाचे आरक्षण जाहीर झाल्यानंतर किनवट शहरात राजकीय हालचालींना वेग आला आहे. सर्वसाधारण (महिला) प्रवर्गासाठी आरक्षण निश्चित झाल्यानंतर इच्छुक उमेदवारांकडून संपर्क मोहिमा, बैठकांचे सत्र आणि रणनीती आखणी सुरू झाली आहे. या पार्श्वभूमीवर सुभाष नगर येथील तरुण उद्योजक व सामाजिक कार्यकर्ते बाबाभाई यांनी नगराध्यक्षपदासाठी त्यांच्या सौभाग्यवतींना निवडणुकीत उतरवण्याची जोरदार तयारी सुरू केली असून, त्यांच्या उमेदवारीबाबत शहरभर चर्चांना उधाण आले आहे.उद्योग क्षेत्रासोबतच सामाजिक कार्यात सक्रिय असलेले बाबाभाई हे किनवट शहरातील एक ओळखलेले नाव आहे. समाजकार्यातील त्यांचा उत्साह, जनतेशी थेट संपर्क आणि सर्व समाजघटकांतील लोकप्रियता यामुळे त्यांचे नाव सध्या चर्चेत आहे. उद्योग आणि राजकारणात बब्बरशेर म्हणून परिचित



असलेल्या बाबाभाई यांच्या उमेदवारीमुळे नगराध्यक्षपदाच्या शर्यतीत नवा रंग भरला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून बाबाभाई यांनी समाजकार्यासाठी स्वतःला झोकून दिले आहे. जाती-धर्माच्या पलीकडे जाऊन त्यांनी मानवतेच्या भावनेने काम केले आहे. गोरगरीब व उपेक्षित घटकांच्या अडचणीच्या काळात ते नेहमी धावून जातात. शेती अवजारांचे उद्योजक असल्याने शहरातच नाही तर आसपासच्या पंचक्रोशीतील शेतकऱ्यांच्याहि ते परीचयाचे व जवळचेही आहेत लग्नसमारंभ असो वा रुग्णालयातील आपत्कालीन प्रसंग त्यांची ॲम्ब्युलन्स सेवाही तत्पर असतेच, आणि वेळप्रसंगी आर्थिक मदतीसाठी त्यांचा हात नेहमी पुढे असतो.

त्यांच्या या निस्वार्थ सेवाभावामुळे शहरात त्यांना विशेष स्थान मिळाले आहे. उद्योग क्षेत्रातील भरीव कामगिरी, वित्तीय शिस्त, आणि व्यापक जनसंपर्कामुळे त्यांनी सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

या पार्श्वभूमीवर सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी आरक्षित झालेल्या नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत बाबाभाई यांच्या पुढाकाराने राजकीय वातावरण चांगलेच तापणार आहे. शहरातील दिग्गज आणि नवोदित चेहरे दोघेही मैदानात उतरण्याची तयारी करत असताना, बाबाभाईंच्या प्रचार आणि जनसंपर्काच्या जाळ्यामुळे आगामी निवडणूक किनवटमध्ये रंगतदार ठरण्याची चिन्हे आहेत.

शहरात सध्या एकच चर्चा सुरू आहे – या वेळेला किनवट नगरपरिषदेच्या मैदानात बाबाभाईंच्या इंट्री ने विरोधकांचा जाळ आणि धूर संगटच निघणार!

# गोरगरिबांना लुटणाऱ्या भ्रष्ट लोकांचा अंत जवळ आला आहे–विवेक जाधव

लोकनेता न्यूज नेटवर्क

**उदगीर (एल पी उगिले)**

अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणावर शेतीचे नुकसान झाल्यानंतरही राज्य सरकारने शेतकऱ्यांना केवळ किरकोळ मदत जाहीर करून त्यांच्यावर अन्याय केला आहे. उद्योगपतींचे हजारो कोटींचे कर्ज माफ करण्यासाठी सरकारकडे निधी उपलब्ध असतो, पण शेतकऱ्यांचे कर्ज माफ करायचे म्हटले की, तिजोरीवर भार पडतो. ही सरकारची दुहेरी नीती स्पष्ट दिसते आहे, असे विचार युवक काँग्रेस उदगीरचे तालुकाध्यक्ष विवेक पंडितराव जाधव यांनी व्यक्त केले आहेत.

शेतकऱ्यांचा कांदा आज केवळ ५ रुपयांना विकला जात आहे, तर सोयाबीनचे भाव अजूनही ४,००० रुपयांच्या घरात आहेत. यावरून सरकारला शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासाची कसलीच चिंता नाही, हे स्पष्ट होते.स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुकीसंदर्भात त्यांनी सांगितले की, ग्रामीण भागातील पंचायतराज संस्थांचा उद्देश जनतेचा विकास असावा, मात्र



आज या संस्थाच सत्ताधाऱ्यांच्या भ्रष्टाचाराचे केंद्र बनल्या आहेत. तालुक्यात सर्वत्र विहीर मंजूर करण्यासाठी ५०,०००, गोठा मंजूर करण्यासाठी १०,०००, घरकुल योजनेचे बिल काढण्यासाठी २५,००० असे ठरलेले रेट कार्ड असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून येत आहेत. ही परिस्थिती अत्यंत गंभीर असून, जनतेच्या सहनशीलतेचा अंत झाला आहे, असेही त्यांनी नमूद केले.

शेतकऱ्यांची मालवाहतूक करणाऱ्या गाड्यांवर प्रशासनाकडून ३०,००० ते ५०,००० पर्यंत दंड आकारला जात असताना, मोठ्या उद्योजकांच्या वाहनांवर मात्र कारवाई होत नाही. नियम आणि कायदे हे केवळ गरीबांना लुटण्यासाठी वापरले जातात, हे वास्तव आज उघड झाले आहे. आता हा अन्याय थांबवण्याची वेळ आली आहे, असेही जाधव म्हणाले.

या अन्यायाविरोधात काँग्रेस पक्षच सक्षम पर्याय ठरणार आहे. येणाऱ्या निवडणुकांमध्ये आ. अमित देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली, जिल्हाध्यक्ष अभयदादा साळुंके व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सचिव कल्याण पाटील यांच्या नेतृत्वात युवक काँग्रेस उदगीरचे पदाधिकारी पक्षाची विचारधारा प्रत्येक गावापर्यंत पोहोचवून काँग्रेसच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावतील.

ही संस्था कोणत्याही नेत्याची किंवा अधिकाऱ्याची मालमत्ता नसून इथली मालक जनता आहे. आता जनतेसाठी, जनतेच्या अधिकारासाठी लढणारे लोकप्रतिनिधी निवडून येणार हे निश्चित आहे, असे सांगून विवेक जाधव म्हणाले की, आगामी निवडणुकांमध्ये युवकांना प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे. ही आग्रही भूमिका राहणार असून, पक्षश्रेष्ठी पात्र युवकांना नक्कीच संधी देतील, असा ठाम विश्वास मी व्यक्त केला आहे.

# स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर स्थानिक पदाधिकारी तुपाशी अन् कार्यकर्ते उपाशी ?

लोकनेता न्यूज नेटवर्क

**हानेगाव | संतोष चिद्रावार लोणीकर**

निवडणूक आली की स्थानिक नेत्यांना कार्यकर्ते आठवतात.निवडणुक झाली की त्यांचा सोयीस्कर विसर पडतो.राजकीय लाभाच्या वेळी तर कार्यकर्ते दिसतही नाहीत.यामुळे आगामी स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नेते तुपाशी अन् कार्यकर्ते उपाशी असे चित्र दिसल्यास त्यात आश्चर्य वाटायला नको.

घरोघरी प्रचाराची पत्रके वाटण्या पासुन नेत्यांच्या सभांना गर्दी जमविण्या पर्यत आणि मतदारांना घराबाहेर काढुन मतदान केंद्रापर्यंत नेण्यापासुन मतदारांचा कल कुणाच्या बाजुने आहे याची माहिती संकलित करण्यापर्यंतची अनेक कामे पक्षाच्या कार्यकर्ते उपाशी असेच चित्र पहायला मिळते.

निवडणूक जाहीर झाली की सर्वांत आधी कामाला लागतात ते पक्षातील कार्यकर्ते.मतदाराच्या घरोघरी हॅडबील आणि स्लिप पोहचविण्याची जबाबदारी कार्यकर्त्यांची असते.बडया कार्यकर्त्यांचे खिसे नेत्यांकडून गरम केले जात असताना तळागाळातलया कार्यकर्त्यांना पदरांत फार काही पडत नाही.

पक्षाच्या मुख्य पाया म्हणजे सामान्य व निष्ठावंत कार्यकर्ते असतात .कार्यकरत्याच्या भरवशावरच पक्ष आणि नेते मोठे होत असतात. पक्षाचे आंदोलन, कार्यक्रम असो वा निवडणुका.त्याची मदार असते नेत्यांसाठी घरावर तुळशीपत्र ठेवून लढणाऱ्या कार्यकर्त्यावर! किंबहुना कार्यकर्ता हा पक्षाचा व नेत्यांच्या कणा असतो मात्र आजकाल हा कणा मात्र फक्त मोडताना दिसतो.कार्यकरताचा वापर फक्त सतरंज्या उचलायला होतो. झेंडे लावायला व नारे लावायला होतो याव्यतिरिक्त कार्यकर्ता काय करतो, त्याला काही अडचण आहे का, त्याचा कुटुंब कसा आहे यांचा विचार कुठल्याही पक्षाचा स्थानिक नेता करत नाही.

पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी सत्तेचा मलिदा चाखायचा आणि कार्यकर्तेनी फक्त माईक, टेस्टीग, सतरंजी उचलणे, हातात झेंडे, घेऊन फक्त मिरवायचे का? असाही प्रश्न क्षेत्रातील विविध पक्षांच्या सामान्य कार्यकर्त्यांना पडला आहे

पक्षातील काही विशिष्ट लोकच सत्तेचा मलिदा चाखत असल्याचे चित्र गेल्या अनेक वर्षापासून नागरिकांना यांची देही याची डोळा बघायला मिळत आहे.त्यात फरकटत जात आहे तो पक्षाचा निष्ठावंत असा एकनिष्ठ कार्यकर्ता त्याला ना कुठली समिती, ना कुठले विशेष कार्यकारी अधिकारी, ना कुठले पद, ना हाताला काम मिळाल्याचे दिसून आले. तुम्हाला कधीतरी काहीतरी देऊ असे म्हणुन - म्हणून आता त्यांच्यावर पार कंबरडे मोडायची आणि झिजलेल्या चपला बदलायची वेळ आली.परंतु नेहमीप्रमाणे कार्यकर्त्यांच्या हाती मात्र आश्वासनांचे गाजरच बघायला मिळाल्याचे दिसून आले.

गेले वर्षांनुवर्षे शहरातील केवळ काही ठराविक नेते मंडळीच सत्तेचा मलिदा चाखत आहेत. कार्यकर्ते मात्र एकनिष्ठ राहुन खांद्याला खांदा लावून झिजतोय. स्थानिक नेते मात्र सत्ता आली की सामान्य कार्यकर्त्यांना हळुच बाजुला करुन पुढील निवडणूका येईपर्यंत कोणीही विचारत नाहीत?

असाही प्रश्न सामान्य कार्यकर्त्यांनी उपस्थित करताना दिसत आहेत.

तर स्थानिक नेत्यांनी करायचे कार्यकर्ते गोळा आणि कार्यकर्त्यांनी करायच्या सतरंज्या गोळा? त्यामुळे आगामी स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत नेते तुपाशी तर कार्यकर्ते उपाशी, असे चित्र दिसेल काय हे आगामी स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत कळेल.

# खुलताबाद तालुक्यातील खांडी पिंपळगाव येथे युक्त धारा प्रनाली अंतर्गत रोहयो योजनेचा पंचवार्षिक कृती आराखडा तयार

लोकनेता न्यूज नेटवर्क

**खुलताबाद | बाळू श्रीखंडे**

खुलताबाद तालुक्यातील खांडी पिंपळगाव येथे राज्य पुरस्कृत युक्त धारा प्रणाली अंतर्गत जिल्ह्यामध्ये व तालुक्यामध्ये खांडी पिंपळगाव ग्रामपंचायत ची निवड झालेली असून त्या अंतर्गत रोजगार हमी योजनेअंतर्गत फळबाग कंपार्टमेंट बंडिंग सीसीटी एलबीएस व रोजगार हमी योजनेअंतर्गत होणारे अनेक कामे या अंतर्गत येणाऱ्या पाच वर्षांचा कृती आराखडा तयार करण्यात आलेला आहे तरी या कार्यक्रमासाठी माननीय गटविकास अधिकारी श्री प्रकाशजी नाईक साहेब तसेच सहाय्य कार्यक्रमाधिकारी अभिजीत जी गायकवाड. ग्रामविकास अधिकारी श्री गवळी मॅडम झेडपी जलसंधारण अधिकारी तेजस्विनी बारवाल तसेच कृषी सहाय्यक सचिन सरगर खांडी पिंपळगाव बीटचे वनपाल श्री शिंदे साहेब. पंचायत समिती लिपिक तथा संगणक परिचालक भीमाशंकर लांडगे दिनेश सपकाळ यांची उपस्थिती व त्यामध्ये सीसीटी असेल वैयक्तिक सिंचन विहीर गुरांचा गोठा मनरेगा अंतर्गत जवळपास २६६ कामांना या ग्रामसभेमध्ये मंजुरी देण्यात आली याप्रसंगी ग्रामपंचायत उपसरपंच मच्छिंद्र महालकर मंगलबाई महालकर भाऊसाहेब श्रीखंडे योजना दुत सचिन महालकर तथा ग्रामपंचायत संगणक परिचालक प्रमोद महालकर ग्रामपंचायत शिपाई दिलावर सय्यद अमोल राठोड तसेच ग्रामपंचायत सदस्य व सर्व ग्रामपंचायत कर्मचारी यांची उपस्थिती ग्रामपंचायत सदस्य मंगलबाई महालकर . सुभाष भालेराव माजी सरपंच अशोक उबाळे कारभारी महालकर भाऊसाहेब श्रीखंडे ग्रा रोजगार सहाय्यक तथा तालुका अध्यक्ष बाळासाहेब श्रीखंडे व बाजार सावंगी चे रोजगार सहाय्यक संतोष नलावडे सुलतानपूर ग्रामपंचायतचे ग्रामरोजगार सहाय्यक अस्लम पठाण टेक्निकल ऑफिसर भरत शेळके विठ्ठल चव्हाण रामकृष्ण काकडे खिर्डी ग्रामपंचायत रोजगार सहाय्यक अनिल मोरे यांची उपस्थिती प्रामुख्याने आढळून आली.

# काँग्रेस स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक ताकतीने लढवणार–माजी आ.हणमंतराव पाटील बेटमोगरेकर

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुखेड | संजय यलमवाड**

मुखेड येथे कॉंग्रेस पक्ष कार्यालयात स्थानिक स्वराज्य संस्था निवडनूकीच्या अनुषंगाने बैठक घेन्यात आली काँग्रेस मित्रपक्ष,वंचित व समविचारींना सोबत घेऊन स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुक पूर्ण ताकतीनिशी लढविणार असल्याचे प्रतिपादन काँग्रेस जिल्हाध्यक्ष माजी आ. हणमंतराव पाटील बेटमोगरेकर यांनी मुखेड येथील काँग्रेस आढावा बैठकीत केले.

मुखेड शहर व काँग्रेस कमिटी कडून स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक, वोट चोर स्वाक्षरी मोहीम आणि पदवीधर मतदार नोंदणी या विषयावर मोंढ्यातील काँग्रेस पक्ष कार्यालय काँग्रेस भवन मध्ये एक आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती तर




डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकाजवळ वोट चोरी बद्दल स्वाक्षरी मोहीम राबविण्यात आली. कार्यालयातील बैठकीचे अध्यक्षस्थानी माजी आ. हनुमंतराव पाटील बेटमोगरेकर हे होते तर प्रदेश सरचिटणीस डॉ.श्रावण रॅपनवाड, ज्येष्ठ नेते शिवलिंगराव पाटील कामजळगेकर, तालुकाध्यक्ष राजीव पाटील रावणगावकर कार्याध्यक्ष संभाजी पाटील उंदरीकर, शहराध्यक्ष हनुमंत नारनाळीकर यांची प्रमुख उपस्थिती होती. बैठकीत अनेक कार्यकर्त्यांची मते जाणून घेऊन हनुमंतराव पाटील यांनी वोट चोरी, पदवीधर मतदार नोंदणी यासह आगामी काळातील नगरपालिका जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकी बद्दल सविस्तर मार्गदर्शन केले.ते म्हणाले की या सर्व निवडणुकीत निष्ठावान कार्यकर्त्यांना संधी देऊन पक्ष पूर्ण ताकतीने न्याय देण्याची भूमिका बजावेल. येणाऱ्या निवडणुकीत वंचीत बहुजन आघाडी सोबत आघाडी होईल याबाबत वरीष्ठ स्थरावर बोलणी चालु असुन मनुवादी भाजपाला पराभूत करण्यासाठी सर्व कार्यकर्त्यांनी एकजुटीने कार्यरत रहावे असे आवाहन केले या आढावा बैठकीनंतर पत्रकार परिषदेत जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार हणमंतराव पाटील बेटमोगरेकरांनी काँग्रेसची भुमिका विशद केली यावेळी कार्याध्यक्ष संभाजी पाटील उन्द्रीकर,जि.प.माजी सदस्य प्रकाश उलगुलवाड,दत्तात्रय चौधरी,शिवाजी गायकवाड,बाळासाहेब पुंडे,हौगीराव पाटील नंदगावकर,वैजनाथ तिपणे,मारोती पाटील मटके,बालाजी वारे,जयप्रकाश कानगुले,रामेश्वर पाटील इंगोले,बालाजी साबणे,अखिल येवतीकर, केतन मामडे, विशाल गायकवाड, बालाजी वाडेकर,प्रकाश निमलवाड,माधव हुरजळ,राजु पाटील नागरजांब, इरफान मोमीन,आसद बल्की,संजय पिल्लेवाड,विठ्ठल पंदीलवाड सह शहरातील व ग्रामीण भागातील काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# श्री गजानन लक्ष्मीबाई रामभाऊ सूर्यवंशी शिक्षक व त्याच्या सुविद्य पत्नी समाजसेविका सौ.अर्चना गजानन सूर्यवंशी यांना 'सपत्नीक राज्यस्तरीय समाज रत्न पुरस्कार' प्रदान

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकरदन । राम शिंदे**




जालना जिल्ह्यातील धावडा येथील श्री गजानन रामभाऊ सूर्यवंशी व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ अर्चना गजानन सूर्यवंशी यांचा सपत्नीक राज्यस्तरीय समाज रत्न पुरस्कार गोंदिया व भंडारा या ठिकाणी देऊन त्यांचा ट्रॉफी देऊन सन्मान करण्यात आला तसेच ते नेहमी सदैव अग्रेसर असलेले सामाजिक शैक्षणिक कार्यात सातत्याने योगदान देणाऱ्या आणि आपल्या कर्तृत्वाने समाजात वेगळंस्थान निर्माण करणाऱ्या व विशेष उल्लेखनीय कार्य म्हणजे स्व रामभाऊ सूर्यवंशी निःशुल्क वधू वर सूचक केंद्र या माध्यमातून त्यांनी हजारो लग्न जुळवले व तेही निःशुल्क अगदी मोफत व हा जनसेवेचा वसा त्यांनी समाजाभिमुख कार्य व त्यांच्या या कार्या मधून त्यांनी विवाह जुळविले व त्यांच्या हातून सर्व विवाह सुखी संसार समाधानी नांदत आहे श्री गजानन लक्ष्मीबाई रामभाऊ सूर्यवंशी (शिक्षक) आणि त्यांच्या अर्धांगिनी सौ अर्चना गजानन सूर्यवंशी यांना सपत्नीक *राज्यस्तरीय समाज रत्न पुरस्कार २०२५' ला देऊन सन्मानित करण्यात आले आहेत.

तसेच सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात त्यांनी केलेले कार्य अत्यंत उल्लेखनीय असून, समाजात समता, बंधुता आणि सहकार्याची भावना रुजवण्यासाठी त्यांनी मोठ्या निष्ठेने व सेवाभावाने काम केले आहे. शिक्षण क्षेत्रात कार्यरत असलेले श्री गजानन लक्ष्मीबाई रामभाऊ सूर्यवंशी हे विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्ये, शिस्त आणि समाजाभिमुख दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी विशेष ओळखले जातात. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थ्यांनी यशस्वी वाटचाल केली आहेत.

त्याचबरोबर त्यांच्या खांद्याला खांदा लावून त्यांना साथ देणाऱ्या त्यांना साथ देणाऱ्या त्यांच्या अर्धांगिनी सौ .अर्चना गजानन सूर्यवंशी यांनी महिला सक्षमीकरण, पारिवारिक सल्ला, सामाजिक एकजूट आणि गरजूंसाठी मदतीचा हात पुढे करण्याच्या कार्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहेत. तसेच समाजातील महिलांमध्ये आत्मभान व आत्मनिर्भरतेची जाणीव निर्माण करण्यासाठी त्यांनी विविध उपक्रम राबवले आहेत.

तसेच गोंदिया व भंडारा जिल्ह्यातील समाजबांधवांच्या वतीने त्यांचे कार्य पाहून त्यांना राज्यस्तरीय समाजरत्न सन्मान मिळाल्यामुळे परिसरात आनंदाचे वातावरण आहे.

हा पुरस्कार त्यांना एका विशेष संत नगाजी महाराज पुण्यतिथी व शिवरक्षक शिवरत्न जिवाजी महाले जयंती एक दिवसीय कार्यक्रमात प्रदान करण्यात आला, ज्याला विविध मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते आणि शिक्षण क्षेत्रातील राजकीय व्यक्ती उपस्थित होते.

'राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्कार' हा राज्यभरातील विविध सामाजिक शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना दिला जातो.

तसेच सूर्यवंशी दाम्पत्याचा या पुरस्कारामुळे सन्मान वाढवला असून, त्यांनी हे यश व हा राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्कार हा आई वडील व परिवार व हितचिंतक मित्र परिवार समाजातील प्रत्येक घटकाला समर्पित केल्याचे सांगितले आहेत.

यावेळी उपस्थित होते गोंदिया येथील संयोजक आयोजक बेनीराम फुलबांधे .समाजसेवक संजयजी चत्रे (पत्रकार ) जिल्हा परिषद अध्यक्ष उपाध्यक्ष सभापती ओबीसी महामंडळ वर्ग एक अधिकारी सौ फडणवीस मॅडम .गोंदिया येथील उपजिल्हाधिकारी . तहसीलदार .शिवव्याख्याते .

प्रदीपजी कदम आंतरराष्ट्रीय हेयर आर्टिस्ट उदयजी टक्के . हभप वैष्णवी आतकारे यासह अन्य मान्यवर उपस्थित होते

अशी माहिती सामाजिक कार्यकर्ते तपास समाजसेवा करणारे रवींद्र सूर्यवंशी तसेच आदर्श शिक्षक गजाननलक्ष्मीबाई रामभाऊ सूर्यवंशी यांनी माहिती दिली आहेत्यांच्या या गौरवाबद्दल समाजातील अनेक संस्थांनी आणि व्यक्तींनी व मित्रमंडळ यांनी अभिनंदनाचा वर्षाव केला असून, त्यांच्या पुढील सामाजिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## मे.लॅबगार्ड कंपनीतील कामगारांची दिवाळी गोड!

# कामगार नेते महेंद्रशेठ घरत यांच्या नेतृत्वाची कमाल,कामगारांना दहा हजार रुपये पगारवाढ

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उरण । विठ्ठल ममताबादे**




रायगड जिल्ह्यातील पेण येथील लॅबगार्ड कंपनीतील कामगारांसाठी न्यू मेरीटाईम ऍण्ड जनरल कामगार संघटने मार्फत हा ३ रा पगारवाढीचा करार करण्यात आला. दिनांक १६ ऑक्टोबर रोजी संघटनेच्या पनवेल कार्यालयात हा करार करण्यात आला. संघटनेचे अध्यक्ष, राष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत हे आयटीएफ या बहुराष्ट्रीय संघटनेच्या जागतिक परिषदेसाठी सध्या ब्राझिल (साऊथ अमेरिका) येथे आहेत परंतू कामगारांना मिळणारे फायदे थांबू नये म्हणून आपल्या अनुपस्थीतीत संघटनेच्या इतर पदाधिकाऱ्यांना करारावर सही करण्याचे अधिकार त्यांनी दिल्यामुळे आज हा करार होवुन त्याचा फायदा कामगारांना होवू शकला .या करारनाम्यानुसार कामगारांना १०,००० रुपये पगारवाढ, १२.५% बोनस, मेडीक्लेम, पिकनिक, रजांमधे वाढ करण्याचे मान्य करण्यात आले आहे. या करारनाम्यानुसार पगारवाढीच्या फरकाची रक्कम कामगारांना दिपावली सणापूर्वी अदा करण्यात येणार आहे त्यामुळे कामगारांची दिवाळी गोड होणार आहे. या करारनाम्या प्रसंगी संघटनेचे कार्याध्यक्ष पि.के.रमण, सरचिटणीस वैभव पाटील, व्यवस्थापनातर्फे डायरेक्टर अजय कणेकर, प्रोडक्शन मॅनेजर राहुल जोगत तसेच कामगार प्रतिनिधी हरेश पाटील, सुरेश दळवी, प्रमोद पाटील. रोहन कडव, प्रदिप धनावडे, सुभाष पाटील आदी उपस्थित होते. दिपावलीच्या पूर्वसंधेला झालेल्या पगारवाढीच्या करारामुळे कामगारांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

# वीस वर्षांपासून बंद असलेली मुखेड–मांडवी बस आजपासून धावणार

## जयश्री नविन राठोड यांच्या प्रयत्नाला यश

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मांडवी । किरण भंडारवार**



गेल्या वीस वर्षापासून बंद असलेली मुखेड –मांडवी बस सुरु करण्याची जयश्री नविन राठोड या दाम्पत्यांनी मागणी करताच ही बस आज पासून सुरु होणार असल्याची माहिती मुखेड आगार प्रमुख सुभाष पवार यांनी दिली आहे.मुखेड आगाराची नियत क्रं. ७८ ही मुखेड ते नरसी, नांदेड, हदगाव, उमरखेड, श्रीक्षेत्र माहूर, श्रीक्षेत्र उनकेश्वर, मांडवी मुक्कामी बस मागील २० वर्षांपासून बंद होती. दरम्यान कृउबा समितीचे संचालक नवीन राठोड व जयश्री राठोड यांनी परिवहन मंत्री सरनाईक तसेच नांदेडचे विभागीय नियंत्रत्रक चंद्रकांत वडस्कर,विभाग नयंत्रक यांनी १५ ऑक्टोबर रोजी सदर बस सुरु करण्याचे मुखेड आगार प्रमुखाला आदेश दिले. त्यावरून सदर बस मुखेडहून दुपारी २:४५ वा. सुटणार नांदेडहून सायंकाळी ४:३० वा. सुटेल व रात्री ९ वा. मांडवी मुक्कामी पोहचेल व मांडवीहून सकाळी ७ वा. सुटून मुखेडला दुपारी २ वा. पोहचणार आहे. एक महिन्या पुर्वी ही राठोड यांनी मागणी केलेल्या वाशिम ते मांडवी बस सुरु केली आहे.विभागीय वाहतुक अधिकारी कमलेश भारती यांच्या कडे १० सप्टेंबर रोजी निवेदनाद्वारे मागणी केली होती.

(वार्ताहर)––श्रीक्षेत्र उनकेश्वरः गेल्या वीस वर्षापासून बंद असलेली मुखेड –मांडवी बस सुरु करण्याची जयश्री नविन राठोड या दाम्पत्यांनी मागणी करताच ही बस आज पासून सुरु होणार असल्याची माहिती मुखेड आगार प्रमुख सुभाष पवार यांनी दिली आहे.मुखेड आगाराची नियत क्रं. ७८ ही मुखेड ते नरसी, नांदेड, हदगाव, उमरखेड, श्रीक्षेत्र माहूर, श्रीक्षेत्र उनकेश्वर, मांडवी मुक्कामी बस मागील २० वर्षांपासून बंद होती. दरम्यान कृउबा समितीचे संचालक नवीन राठोड व जयश्री

# दहावी–बारावी परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना खाजगीरित्या फॉर्म नं. १७ भरुन परीक्षेस प्रविष्ट होण्याची सुविधा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । अनिल पाटील तेलंग**



महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत माध्यमिक शालान्त (इ. १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना खाजगीरित्या फॉर्म नं. १७ भरुन परीक्षेस प्रविष्ट होण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

इ. १० वी व इ. १२ वी परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थ्यांसाठी सर्व शाळा, कनिष्ठ महाविद्यालये मंडळाच्या अटी शर्तीनुसार नावनोंदणी करण्यासाठी उपलब्ध आहेत. यासंदर्भातील सर्व माहिती व मार्गदर्शक पुस्तिका मंडळाच्या http://www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. अधिक माहितीसाठी सर्व विद्यार्थी, शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांनी आपल्या कार्यकक्षेतील विभागीय मंडळाशी संपर्क साधावा, असे आवाहन राज्य शिक्षण मंडळाने केले आहे.

फेब्रु–मार्च २०२६ मध्ये होणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थी नावनोंदणी अर्ज (फॉर्म नं. १७) विलंब शुल्कासह ऑनलाईन स्वीकारण्याच्या तारखा पुढीलप्रमाणे आहेत.

विद्यार्थ्यांनी नावनोंदणी अर्ज व शुल्क ऑनलाईन भरुन मूळ अर्ज ऑनलाईन नावनोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोहोच पावतीच्या दोन छायाप्रती व मूळ कागदपत्रे अर्जावर नमूद केलेल्या शाळेत / कनिष्ठ महाविद्यालयात जमा करणे या तपशीलानुसार विलंब शुल्कासह (प्रति विद्यार्थी शंभर रुपये) नावनोंदणी अर्ज ऑनलाईन स्विकारण्याच्या तारखा गुरुवार १६ ऑक्टोबर ते शुक्रवार ३१ ऑक्टोबर २०२५ या राहतील.खाजगी विद्यार्थ्यांनी इ. १० वी व इ. १२ वीसाठी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन पध्दतीनेच भरावयाचे आहेत. त्यामुळे कोणाचाही ऑफलाईन अर्ज स्वीकारला जाणार नाही. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी http://www.mahahsscboard.in या संकेतस्थळाचा वापर करावा. अर्ज भरण्यासाठीच्या सूचना संकेतस्थळावर उपलब्ध आहेत त्या वाचून अर्ज भरण्यास सुरुवात करावी. यासंदर्भात अधिक माहितीसाठी शाळा, कनिष्ठ महाविद्यालय, विभागीय मंडळाकडे संपर्क साधावा.विद्यार्थ्याने अर्ज भरण्याकरिता शाळा सोडल्याचा दाखला (मूळ प्रत) नसल्यास द्वितीय प्रत व प्रतिज्ञापत्र, आधारकार्ड, स्वतःचा पासपोर्ट आकारातील फोटो स्वतः जवळ ठेवावा, ऑनलाईन अर्ज भरताना सदर कागदपत्रे स्कॅन करुन अपलोड करावयाची आहेत.पात्र विद्यार्थ्यांना नावनोंदणी प्रमाणपत्र ऑनलाईन देण्यात येणार आहे. पात्र विद्यार्थ्यांना नावनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर त्यांनी परीक्षेची आवेदनपत्रे मंडळाने विहीत केलेल्या कालावधीत परीक्षा शुल्कासह भरणे आवश्यक आहे. आवेदनपत्रे भरल्यानंतर संबंधित विद्यार्थ्यांनी छाननीसाठी दिलेली मूळ कागदपत्रे संबंधित माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयाकडून परत घेऊन जाण्याची दक्षता घ्यावी, असे आवाहन राज्य शिक्षण मंडळाचे सचिव यांनी केले आहे.

# ग्रामीण भागातील तरुणांचा राष्ट्रवादीकडे ओढा–सुनील केंद्रे



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उदगीर (एल.पी. उगीले)**

उदगीर तालुक्यातील ग्रामीण भागातील युवकांनी मोठ्या प्रमाणात उदगीरचे आमदार तथा विकास पुरुष माजी मंत्री संजय भाऊ बनसोडे यांच्या नेतृत्वाखाली, महाराष्ट्राचे सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील, मराठवाडा विभाग शिक्षक मतदार संघाचे आमदार विक्रमजी काळे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अफसर बाबा शेख यांच्या प्रमुख उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते सुनील भाऊ केंद्रे यांच्या प्रयत्नातून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. ही गोष्ट उदगीर विधानसभा मतदार संघाच्या आणि येऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची गोष्ट ठरत आहे. अजित दादा पवार यांचा विकासात्मक दृष्टिकोन आणि स्थानिक चे आमदार संजय भाऊ बनसोडे यांनी उदगीर विधानसभा मतदारसंघाचा केलेला कायापालट, या विकासाच्या मुद्द्यावर साहेबराव श्रीपती तलवारे, दयानंद श्रीपती तलवारे, शरद पुंडलिक तलवारे, बालाजी अशोक राचलवार, तुकाराम उत्तम अर्जुने या कार्यकर्त्यांनी मोठ्या उत्साहात आणि आनंदपूर्ण वातावरणात राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. विशेष बाब म्हणजे बाळासाहेब उर्फ बाळराजे विठ्ठलराव पवार हे भारतीय जनता पार्टीचे युवा मोर्चाचे नेते असून देखील त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करून लोककल्याणाचा वसा उचलला आहे.

ही बाब आगामी निवडणुकीच्या दृष्टीने फार चांगली झाल्याचे मत युवा नेते सुनील भाऊ केंद्रे यांनी व्यक्त केले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका येऊ घातल्या असताना राष्ट्रवादी काँग्रेसकडे युवकांचा हा ओढा निश्चितच सकारात्मक बदल घडवून आणेल. असा विश्वासही सुनीलभाऊ केंद्रे यांनी व्यक्त केला आहे.

# मुखेड नगर परिषद सार्वजनिक निवडणूकीच्या अनुषंगाने मा.आमदार डॉ.तुषार राठोड यांच्या जनसंपर्क कार्यालयात वार्डातील प्रमुख पदाधिकार्यांची बैठक संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुखेड । संजय यलमवाड**

दिनांक १५/१०/२०२५ रोजी आमदार जनसंपर्क कार्यालयात मुखेड कंधार विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार डॉक्टर तुषार जी राठोड साहेब यांच्या आदेशाने व माजी नगराध्यक्ष गंगाधर रावजी राठोड साहेब यांच्या नेतृत्वाखाली होऊ घातलेल्या मुखेड नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या अनुषंगाने आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती

सर्वप्रथम महापुरुषाच्या फोटोला पुष्पहार अर्पण करून आमचे नेते मुखेड नगरीची माजी नगराध्यक्ष राठोड साहेब यांचा सत्कार मुखेड शहर मंडळाच्या वतीने नागनाथ लोखंडे व भाजप युवा मोर्चाच्या शहराध्यक्ष करण रोडगे यांच्या वतीने करण्यात आला या बैठकीला प्रमुख मार्गदर्शक म्हणून आमचे नेते माननीय गंगाधर राठोड साहेब यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले येणाऱ्या निवडणुकीमध्ये एक दिलाने मोठ्या ताकतीने आपल्यालाही निवडणूक जिंकायचे आहे तरी सर्वांनी एकत्र येऊन सर्व वार्डातील प्रमुख पदाधिकाऱ्यांनी मतदान यादीच वाचन करावे मतदाराच्या समस्या जाणून घ्यावे जनतेच्या थेट संपर्कात जावे गेल्या पंचवीस वर्षापासून मुखेड शहरातील जनतेने आपल्यावर दाखवलेला विश्वास सार्थ ठरवण्यासाठी एक दिलाने काम करून पुन्हा नगरपालिकेवर आपल्या भारतीय जनता पार्टीची एक हाती सत्ता आणण्यासाठी सर्व कार्यकर्त्यांनी एक दिलाणे सज्ज व्हावे असे आवाहन कार्यकर्त्यांना करण्यात आले

यावेळी नगरपालिकेतील माजी गटनेते मा.चंद्रकांत गरूडकर माजी नगराध्यक्ष जगन्नाथ कामजे,अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष मा. नासरखान पठाण व्यापारी आघाडी जिल्हाध्यक्ष नंदकुमार मडगुलवार, माझी उपनगराध्यक्ष जगदीश बियाणी, विधानसभा विस्तारक किशोरसिंह चौव्हाण, माजी नगरसेवक उत्तम बनसोडे माजी नगरसेवक राजकुमार बामणे माजी नगरसेवक दीपक मुकावार नगरसेवक सुधीर भाऊ चव्हाण शिवाजी राठोड, शिवकुमार बंडे महादेव देवकते प्रतिनिधी मा.संदीप काळे मार्केट कमिटी संचालक नागनाथ गायकवाड विनोद दंडलवाड,संदीप बादेवाड, गजानन कवटीकवार, कुलदीप गायकवाड गजानन अकुलवाड, बबन सिंह ठाकुर,पवन नाईक,मुखेड शहरातील सर्व बूथ प्रमुख शक्ती केंद्रप्रमुख भारतीय जनता पार्टीचे प्रमुख पदाधिकारी प्रतिष्ठित व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते...



# भोसी जिल्हा परिषद गटातील संभाव्य उमेदवारांच्या मोर्चे बांधनीला सुरुवात;भाजपा-कॉँग्रेस मध्ये होणार चुरशीची लढत

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकर | रमाकांत जोशी**

जिल्हा परिषदेतील सर्व गटाचे आरक्षण जाहीर झाले असल्याने आता निवडणुकांचे वारे वाहु लागले असुन भोकर तालुक्यातील भोसी जिल्हा परिषद गट हा अनुसुचीत जमाती महीले साठी राखीव झाला असल्याने सर्वच पक्षाचे कार्यकर्ते आप आपल्या होम मिनिस्टर साठी उमेदवारी मिळावी म्हणून आपल्या नेत्यांकडे फिल्डिंग लावण्यासाठी धडपड करीत आहेत.

भोसी जिल्हा परिषद गटावरती नेहमी माजी जिल्हा परिषद सभापती तथा गटनेते प्रकाशराव देशमुख भोसीकर यांचे वर्चस्व राहिले आहे पण या वेळेस भोसी जि.प.गट हा अनुसुचित जमाती महिलेसाठी राखीव झाल्याने प्रकाशराव देशमुख भोसीकर यांना दुसरीकडे पर्याय शोधावा लागणार असुन ते पिंपळढव जिल्हा परिषद गटातुन आपले नसीब अजमावणार असल्याचेही बोलल्या जात आहे.

भोसी गट हा अनेक वर्षानंतर अनुसुचित जमातीसाठी राखीव झाल्यामुळे आणि या गटातील माजी सभापती









नागोराव कोठुळे यांनी राजकारणाला पुर्ण विराम दिल्यामुळे आत्ता या गटा मधुन साळवाडी( डोरली) येथील जवळपास २५ वर्षे बिनविरोध संरपंच, तिन वेळा मार्केट कमिटी संचालक,भोकर पंचायत समीती सभापती अशी अनेक पदे भोगलेले आशोकराव चव्हाण यांचे खंदे समर्थक शिवाजी देवतुळे हे आपल्या पत्नी भोकर मार्केट कमीटिच्या माजी संचालीका विजयमाला देवतुळे यांना जिल्हा परिषदच्या निवडणूक आखाड्यात उतरविण्याच्या तयारीत आहेत,तर त्यांच्याच गावातील ग्रामपंचायत सदस्य पदव्युत्तर उच्चशिक्षित चेहरा असलेल्या आणि भोकर मार्केट कमिटीच्या निवडणूकीत आशोकराव चव्हाण यांच्या शब्दाखातर निवडणूकीतून माघार घेतलेल्या भोकर भाजपा महिला आघाडीच्या उपाध्यक्षा सौ.किरणताई रामभाऊ खरोडे देखील आपल्या शिक्षणाच्या जोरावर विविध विकासात्मक मुद्दे घेऊन निवडणूक लडवण्यासाठी सज्ज झाल्या असुन या वेळेस साहेब नक्कीच संधी देतील अशी खात्री बाळगुन कामाला लागल्या आहेत.

भोकर मार्केट कमिटीचे माजी संचालक व सध्या काँग्रेस पक्षाचे अनुसूचित जमाती सेलचे जिल्हाध्यक्ष ताटकळवाडी येथील माजी संरपंच धोंडिबा भिसे हे काँग्रेसकडून आपण एकमेव उमेदवार आहोत आणि तिकीट आपल्यालाच मिळणार म्हणत पत्नीसाठी सर्कल मध्ये मोर्चे बांधनीला सुरवात केली आहे. बोरवाडी येथील संरपंच आसलेल्या संगीता बुलबुले यांच्या साठी देखील त्यांचे पती राजू बुलबुले हे काँग्रेस पक्षाकडून उमेदवारी मिळावी यासाठी जिल्हा कमिटी कडून फिल्डिंग लावली असल्याचे बोलल्या जात आहे.वैद्यकीय क्षेत्रात लोकप्रिय असलेले भोकर येथील डॉक्टर उत्तम वागतकर यानी आदिवासी समाज बांधवांची बैठक घेऊन त्यांच्या होम मिनिस्टर साठी निवडणूक रिंगणात उतरणार असल्याचे संकेत दिले आहेत.तर भोसी जिल्हा परिषद गटामध्ये बाहेरील गटातील उमेदवार देखील अनुसूचित जमातीच्या राखीव जागेवर दावा करणार असल्याचे दबक्या आवाजात बोलल्या जात आसल्याने गटातील इतर उमेदवारांची घालमेल वाढली आहे.भोसी जि.प सर्कल मध्ये काँग्रेस व भाजप यांच्या मध्येच मुख्य लढत होण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे

## शेलघर येथे मंगळवारी दिवाळी पहाट’!

# कैलास मानसरोवर यात्रेवर आधारित ऋसुखकर्ता’ दिवाळी अंकाचे प्रकाशन!

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उरण विठ्ठल ममताबादे**

सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी ऋदिवाळी पहाट’ हा कार्यक्रम आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी पनवेल तालुक्यातील उलवा नोडमध्ये सर्वप्रथम सुरुवात केली. ही परंपरा जपण्यासाठीच ’यमुना सामाजिक, शैक्षणिक संस्था’ आणि रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीतर्फे पनवेल तालुक्यातील शेलघर येथे ऋदिवाळी पहाट’ हा सुमधुर गीतांचा कार्यक्रम मंगळवारी (ता.२१) सकाळी सात वाजता होणार आहे.

’इंडियन आयडाल’ सागर म्हात्रे, ऋहोऊ दे धिंगाणा फेम’ विनल देशमुख, ऋसूर नवा ध्यास नवा फेम’ श्वेता म्हात्रे, तृप्ती दामले यांच्या बहारदार गायनाने ऋदिवाळी पहाट’ रंगणार आहे. विशेष म्हणजे ऋलास्ट स्टॉप खांदा’ या चित्रपटाची टीमही यावेळी उपस्थित राहणार आहे.




दरम्यान, ऋदिवाळी पहाट’ कार्यक्रमानंतर पत्रकार परिषद होणार आहे. लक्ष्मी पूजनाच्या दिवशी युनियनची पत्रकार परिषद ही १९९० पासूनची प्रथा आहे. या पत्रकार परिषदेत कामगारांसाठी वर्षभरात केलेले करार आणि विविध कंपन्यांमधील बोनसचा आढावा घेतला जातो. तसेच पत्रकार बांधवांनी आपापल्या वृत्तपत्रांत दिलेल्या बातम्यांबद्दल धन्यवाद मानले जातात. ही प्रथा गेल्या अनेक दशकांपासून सुरू आहे. यावेळी पत्रकारांशी संवाद साधून त्यांच्याही दिवाळी मिठाई देऊन गोड केली जाते. यावेळी दिवाळी अंकांचा साहित्यिक वारसा जपण्यासाठीच यंदा पहिल्यांदाच ’सुखकर्ता’ या दिवाळी अंकाचे प्रकाशन होणार आहे. हा दिवाळी अंक ऋकैलास मानसरोवर’ या विषयाला वाहिलेला आहे. दोन वेळा कैलास मानसरोवर यात्रा करणारे महेंद्रशेठ घरत हे बहुआयामी अवलिया आहेत. त्यामुळे कैलास मानसरोवर यात्रेचे महत्त्व, त्यांचे अनुभव, तसेच इतरही ज्यांनी कैलास मानसरोवर यात्रा केली आहे, त्यांच्या अनुभवाची शिदोरी वाचकांना देण्याचा प्रयत्न ऋसुखकर्ता’ या दिवाळी अंकातून करण्यात आला आहे. शेलघर येथील दिवंगत जोमा नारायण घरत समाज मंदिर सभागृहाच्या हिरवळीवर हे कार्यक्रम रंगणार आहेत. शेलघर येथील ऋयमुना सामाजिक, शैक्षणिक संस्थे’ची मोलाची भूमिका सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी असल्याने रसिकांनी आणि पत्रकार बांधवांनी या सामाजिक चळवळीचा वसा जपण्यासाठी आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन महेंद्रशेठ घरत आणि शुभांगीताई घरत यांनी केले आहे.

# आरोग्य अधिकारी डॉ.राजेंद्र ईटकरे यांचा निरोप समारंभ उत्साहात संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उरण विठ्ठल ममताबादे**



इंदिरा गांधी शासकीय ग्रामीण रुग्णालय, उरण येथे तालूका आरोग्य अधिकारी डॉ.राजेंद्र ईटकरे यांचा निरोप समारंभ डॉ बी एम कालेल - वैद्यकीय अधीक्षक इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालय उरण यांच्या वतीने आयोजित करण्यात आला.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक वैद्यकीय अधीक्षक डॉ. बी एम कालेल यांनी करतेवेळी डॉ ईटकरे यांच्या शांत, संयमी आणि सर्वांना बरोबर घेऊन करण्याची त्यांची पद्धत तसेच कितीही मोठा प्रसंग असेल तरी शांत पणे विचार करून त्या प्रसंगाला सामोरे जाणे हे स्वभाव वैशिष्ट्ये विषद केले. आणि उपस्थीतांचे स्वागत केले.या कार्यक्रमाला उरण पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हानिफ मुलानी,उरण नगरपरिषदेचे मुख्याधिकारी समिर जाधव, कामगार नेते संतोष पवार, उरण सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सुधाकर पाटील, ड. राजेंद्र मढवी आणि इंदिरा गांधी ग्रामीण रूग्णालयातील डॉक्टर्स आणि नर्सेस तसेच इतर स्टाफ मोठ्या संख्येने आत्मीयतेने उपस्थित होते.या प्रसंगी मनोगत व्यक्त करताना वरिष्ठ पोलीस निरीक्षक हानिफ मुलानी यांनी सांगितले कि डॉ राजेंद्र ईटकरे हे एक सेवाभावी वृत्तीने सेवा देणारे खऱ्या अर्थाने जनसेवा हिच ईश्वर सेवा आहे या उक्तीप्रमाणे काम करणारे डॉक्टर आहेत हे या शासकीय सेवेतील २५ वर्षांपासून मी पाहतो आहे असे गौरवोद्गार काढले.आणि आपण जनतेला उत्तम सेवा देणे क्रमप्राप्त आहे हे आपण कधीही विसरून चालणार नाही असे उपस्थितांना मार्गदर्शन केले.कामगार नेते आणि कोवीड कालावधीत तालूका समन्वयक संतोष पवार यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की खरोखर या कोवीड महामारीने भयभीत जनतेला आधाराची गरज होती आणि ती जबाबदारी शासकीय यंत्रणेने आमच्यावर विश्वास ठेवून सोपवीली आणि ती सर्वांच्या सहकार्याने फार पाडत असताना प्रत्येक रूग्ण हा वाचलाच पाहिजे या भावनेतून सेवा देत असताना तालूक्यातील सेवाभावी वृत्तीच्या अनेक विविध क्षेत्रातील कार्यकर्त्यांचे योग्य वेळी योग्य सहकार्य मिळाले आणि म्हणूनच काम करणे अधिक शक्य झाले.यावेळी उरण सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सुधाकर पाटील, ड राजेंद्र मढवी यांनी मनोगत व्यक्त करताना औद्योगिक दृष्ट्या अतीशय प्रगत असलेला तालूका म्हणजे उरण तालूका अशी उरण तालूक्याची ओळख परंतू तालूक्यात सुसज्ज असे एकही मोठे रूग्णालय नसतानाही कोवीड कालावधी संपूर्ण देश जरी लॉक डाऊन मध्ये होते तरी देशादेशांतर्गत मालाची म्हणजेच अन्न धान्यासह वैद्यकीय साधने सामग्रीसह ईतर अनेक प्रकारच्या मालाची आवक जावक करणारे त्या माध्यमातून या पोर्ट ईंडस्ट्री द्वारे आयात निर्यात करणाऱ्या कामगारांचे काम मात्र सुरूच होते. जेएनपीटी , शिपींग इंडस्ट्री विविध गोडाऊन कोडिंग - अनलोडींगच्या कामाने दिवस - रात्र प्रभावीत असलेला उरण तालुका असल्यामुळे जागतीक किर्तीच्या या जेएनपीटी बंदरातील कामकाज सुरुच होते.या आपल्या उरण तालुक्यातील जनतेला खरोखर त्याकाळात डॉ . राजेंद्र ईटकरे, उरण तालुका आरोग्य अधिकारी यांनी तत्कालीन तहसीलदार भाऊसाहेब अंधारे यांच्या मार्गदर्शनाखाली उत्तम काम केले.असे मनोगत व्यक्त केले.तत्कालीन वैद्यकीय अधिक्षक डॉ. मनोज भद्रे, तालूका समन्वयक संतोष पवार, उरण नगरपरिषद आणि उरण तालुक्यातील विविध विभागातील अधिकारी, कर्मचारी यांचे कोऑर्डिनेशन सुसंगत असल्यामुळे तसेच तालुक्यातील डॉक्टर्स असोसिएशनच्या माध्यमातून सर्व सदस्यांचे सहकार्य उत्तम मिळाले. या सर्वांना एकत्र करणारे डॉक्टर विकास मोरे डॉ सुरेश पाटील, डॉ सत्या ठाकरे, डॉ घनःश्याम पाटील आणि या सर्व डॉक्टर्सना मोलाचे मार्गदर्शन करणारे डॉ. प्रफुल्ल सामंत या सर्वांच्या सहकार्याने तसेच एकजुटीने महाभयंकर कोवीड महामारीवर मात केली तसेच अनेक अडचणींवर मात केली आणि बहुसंख्य नागरिकांचे प्राण वाचले. या वेळी अतिशय जबाबदारीने पार पाडत असताना डॉ. राजेंद्र ईटकरे यांनी हे आरोग्य सेवेचे कार्य दिवस रात्र करत असताना आपल्या सहकारी कर्मचाऱ्यांना आपल्या कुटुंबातील सदस्यांप्रमाणे जपले हे सर्वश्रुत असल्यामुळे ह्या सर्व आठवणींना उजाळा मिळाला आणि हा निरोप समारंभ कार्यक्रम अतीशय हृदयस्पर्शी ठरला.

# खुलताबाद तालुक्यातील खांडी पिंपळगाव येथे युक्त धारा प्रनाली अंतर्गत रोहयो योजनेचा पंचवार्षिक कृती आराखडा तयार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**खुलताबाद | बाळू श्रीखंडे**

खुलताबाद तालुक्यातील खांडी पिंपळगाव येथे राज्य पुरस्कृत युक्त धारा प्रणाली अंतर्गत जिल्ह्यामध्ये व तालुक्यामध्ये खांडी पिंपळगाव ग्रामपंचायत ची निवड झालेली असून त्या अंतर्गत रोजगार हमी योजनेअंतर्गत फळबाग कंपार्टमेंट बंडिंग सीसीटी एलबीएस व रोजगार हमी योजनेअंतर्गत होणारे अनेक कामे या अंतर्गत येणाऱ्या पाच वर्षाचा कृती आराखडा तयार करण्यात आलेला आहे तरी या कार्यक्रमासाठी माननीय गटविकास अधिकारी श्री प्रकाशजी नाईक साहेब तसेच सहाय्य कार्यक्रमाधिकारी अभिजीत जी गायकवाड. ग्रामविकास अधिकारी श्री गवळी मॅडम झेडपी जलसंधारण अधिकारी तेजस्विनी बारवाल तसेच कृषी सहाय्यक सचिन सरगर खांडी पिंपळगाव बीटचे वनपाल श्री शिंदे साहेब. पंचायत समिती लिपिक तथा संगणक परिचालक भीमाशंकर लांडगे दिनेश सपकाळ यांची उपस्थिती व त्यामध्ये सीसीटी असेल वैयक्तिक सिंचन विहीर गुरांचा गोठा मनरेगा अंतर्गत जवळपास २६६ कामांना या ग्रामसभेमध्ये मंजुरी देण्यात आली याप्रसंगी ग्रामपंचायत उपसरपंच मच्छिंद्र महालकर मंगलबाई महालकर भाऊसाहेब श्रीखंडे आमदार योजना दुत सचिन महालकर तथा ग्रामपंचायत संगणक परिचालक प्रमोद महालकर ग्रामपंचायत शिपाई दिलावर सय्यद अमोल राठोड तसेच ग्रामपंचायत सदस्य व सर्व ग्रामपंचायत कर्मचारी यांची उपस्थिती ग्रामपंचायत सदस्य मंगलबाई महालकर . सुभाष भालेराव माजी सरपंच अशोक उबाळे कारभारी महालकर भाऊसाहेब श्रीखंडे ग्रा रोजगार सहाय्यक तथा तालुका अध्यक्ष बाळासाहेब श्रीखंडे व बाजार सावंगी चे रोजगार सहाय्यक संतोष नलावडे कथा सुलतानपूर ग्रामपंचायतचे ग्रामरोजगार सहाय्यक अस्लम पठाण टेक्निकल ऑफिसर भरत शेळके विठ्ठल चव्हाण तथा रामकृष्ण काकडे तथा खिर्डी ग्रामपंचायत रोजगार सहाय्यक अनिल मोरे यांची उपस्थिती प्रामुख्याने आढळून आली.




# मुखेड पंचायत समिती कार्यालयाचा कारोभार राम भरोसे : बीडीओ, सहाय्यक बीडीओ दोन्हीही गैरहजर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुखेड | संजय यलमवाड**

तालुक्यातील ग्रामविकास विभागाचे चित्रच चिंताजनक असल्याचे पुन्हा एकदा उघड झाले आहे. तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या दैनंदिन कामकाजासाठी असलेल्या मुखेड पंचायत समिती कार्यालयालाच राम भरोसे सोडल्याची स्थिती निर्माण झाली आहे. ग्रामविकास व स्थानिक स्वराज्य संस्था कार्यान्वित करण्यासाठी महत्त्वाचे असलेले गटविकास अधिकारी (बीडीओ) रामोड आणि सहाय्यक बीडीओ ढवळे या दोन्ही अधिकाऱ्यांच्या कार्यालयाला नेहमीप्रमाणेच शुक्रवारी दुपारी ३:५० वाजण्याच्या सुमारास कुलूप लटकलेले दिसून आले. यामुळे कार्यालयीन वेळेत येणाऱ्या नागरिकांना परत जावे लागले.





नागरिकांनी माहिती घेण्यासाठी बीडीओ रामोड यांना संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता त्यांचा मोबाईल फोन बंद असल्याचे आढळून आले. तर सहाय्यक बीडीओ यांच्याबद्दल विचारले असता, पंचायत समितीतील कर्मचाऱ्यांनी उडवा-उडवीची उत्तरे दिली. साहेब आत्ताच होते आत्ताच गेले, कुठ गेले माहित नाही अशी भाषा कर्मचारी उत्तर देत आहेत. पंचायत समिती मधील लेखा विभाग, कृषी विभाग, आणि पंचायत विभाग या कार्यालयात एकही कर्मचारी हजर नव्हता सर्व खुर्च्या रिकामी होत्या. या निष्काळजी कारभारामुळे नागरिकांची प्रचंड गैरसोय होत आहे.

**अधिकारी गैरहजेरीमुळे कार्यालयीन शिस्त बिघडली**

कार्यालयीन वेळेत एकही अधिकारी हजर नसल्याने कर्मचाऱ्यांची वचक पूर्णपणे संपली आहे. परिणामी, कोणताही कर्मचारी कधीही येतो, कधीही जातो, याची कोणालाही भीती उरलेली नाही. पंचायत समितीच्या कामकाजाची जबाबदारी असलेले अधिकारीच कार्यालयात बसायला तयार नसल्याने संपूर्ण कारभार राम भरोशावर चालल्याची भावना नागरिकांमध्ये आहे.

**नागरिक त्रस्त, तक्रारीसाठीही अधिकारी सापडत नाहीत**

मुखेड तालुक्यातील ग्रामपंचायतींना पंचायत समिती कार्यालयातून विविध योजनांसाठी कागदपत्रांची पूर्तता, निधी, विकासकामांच्या मंजुरी यासाठी ये-जा करावी लागते. मात्र अधिकारीच गैरहजर असल्याने नागरिकांचे चकरा मारून हाल होत आहेत. विशेष म्हणजे, तक्रार नोंदवायला अधिकारीही सापडत नाहीत, हीच खरी शोकांतिका आहे.

**तात्काळ चौकशीची मागणी**

या सर्व प्रकारामुळे तालुक्यातील नागरिकांत संतापाची लाट उसळली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड यांनी मुखेड पंचायत समितीला अचानक भेट देऊन या निष्काळजी कारभाराची चौकशी करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ७४९९६१५९३३ .या अंकात प्रकाशित झालेल्या बातम्या व लेखा या मधून व्यक्त झालेल्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही (वाद विवाद गेवराई न्यायालयाअंतर्गत)

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 7499615933